# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.११६१/२४/त.क्र.५९/२५/०१**

**श्री. विकास शेंडे**
नागरी बँक कॉलनी राष्ट्र भाषा प्रचार समितीच्या मागे,
हिंदीनगर, वर्धा ४४२००३

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, डॉ. प्रिया अ. देशपांडे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. सतीश खैदमोडे उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. राजेश मांजरेकर उपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी असे विशद केले की, द्वितीय अपील अर्जाच्या आदेशाचे अनुपालन झाले नाही.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारदार श्री. विकास शेंडे यांनी द्वितीय अपील क्र.५७५९/२४/०१ दि. २८.०८.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीत पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसून अद्यापही माहिती प्राप्त झाली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १९(८)(ग) व कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- इतकी शास्ती तसेच सामाजिक न्याय व विशेष विभाग वरिष्ठ नागरिकाचे हक्क देण्याबाबत अपयशी ठरले, असा गंभीर आरोप केला असून त्यावर आज झालेल्या सुनावणीस तक्रारदार श्री.

शेंडे हे ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले असून विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी व विद्यमान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव आज उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त आदेशानंतर वरिष्ठ नागरीक सहाय्यक पोर्टलबाबत अध्यक्ष जनसेवा फाऊंडेशन, पुणे यांचेकडुन ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेल्या National Helpline for Senior Citizens Toll Free Helpline No.14567 ही योजना असून दि.०७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या माहितीनुसार तक्रारदार श्री. शेंडे यांनी अपेक्षिलेली माहिती दि.०९.१०.२०२४ पत्रान्वये त्यांना देण्यात आली असून त्यांना देण्यात आलेले पत्र यात वरिष्ठ नागरिक पोर्टल व जनसेवा फाउंडेशन या संदर्भात सविस्तर अशा स्वरुपाची माहिती तक्रारदार यांना याआधीच प्रदान करण्यात आली असल्याने तक्रारदार यांना द्वितीय अपील अर्जातील प्राप्त आदेशाप्रमाणे माहिती याआधीच प्राप्त झाली असल्याने त्यांची तक्रार ही वरिष्ठ नागरिक योग्य ते साहाय्य मिळत नसल्याबाबत असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तक्रार अर्जावरील मर्यादित कार्यकक्षेत उपरोक्त बाबींचा विचार करणे हे वैधानिक दृष्ट्या शक्य नसून पारित केलेल्या द्वितीय अपील अर्जाचे अनुपालन झाल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra